सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना, सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील (२२३५-०११३) या लेखाशिर्षाखालील प्रस्तावित लेखानुदान दि. १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ पर्यंत खर्चासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. अपअ-२०१९/ प्र.क्र.२३ / का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १३ मे, २०१९

वाचा- १) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दि. ०१ एप्रिल,२०१९
२) महिला व बाल विकास विभाग शासन परिपत्रक क्र. बीजीटी-२०१९/प्रक्र १४/का-४ दिनांक १०.०४.२०१९

प्रस्तावना-

सन २०१९-२० चा अर्थसंकल्प दि. २७ / २/ २०१९ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. हा अंतरीम अर्थसंकल्प असल्याने अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करुन विनियोजन विधेयक मंजूर होईपर्यंतच्या कालावधीसाठीचा (एप्रिल- २०१९ ते जुलै-२०१९) या चार महिन्यासाठीचा खर्च भागविण्यासाठी " महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९ " मंजूर केलेले आहे. सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झाले असून ते महाराष्ट्र अधिनियम क्र. २ दि. ८/३/२०१९ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. सदर अधिनियमानुसार प्रशासकीय विभागांना सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील प्रस्तावित लेखानुदानानुसार दि. १/४/२०१९ ते ३१/७/२०१९ पर्यंत खर्च करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे.

३. सदर अधिनियमानुसार महिला व बाल विकास विभाग सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना, मागणी क्रमांक एक्स -१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६- सुधार सेवा, (०१), (०१), सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना (२२३५-०११३), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली (२२३५-०११३) रु. ३३,००,०००/- फक्त (रु. तेहत्तीस लाख फक्त) इतका निधी दि. १ एप्रिल,२०१९ ते दि. ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २९/०४/२०१९ च्या पत्रासोबत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६ सुधार सेवा (०१) (०१) सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु. २०,००,०००/- फक्त (रु. वीस लाख फक्त) इतक्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

२. त्यास अनुसरुन महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना, मागणी क्रमांक एक्स -१, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६- सुधार सेवा, (०१),

(०१), सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना (२२३५-०११३), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पिय अंदाज सन २०१९-२० नुसार मंजूर रु. ३३,००,०००/- फक्त (रु. तेहत्तीस लाख फक्त) इतका निधी दि. १ एप्रिल, २०१९ ते दि. ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम हजारात)

अ. क्र.	लेखाशीर्ष	**अर्थसंकल्पिय अंदाज सन २०१९-२०**	**सन २०१९-२० चे लेखानुदान**
०१	०२	०३	०४
०१	२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाज कल्याण, १०६- सुधार सेवा (०१) (०१) सराईत अपराधी व अपराधी परिविक्षा योजना. मागणी क्रमांक एक्स १ (२२३५-०११३-३१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)	१,००००	३३००

३. वरील तक्त्यातील स्तंभ क्र.४ येथे दर्शविण्यात आलेला निधी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि. १ एप्रिल,२०१९ व महिला व बाल विकास विभागाच्या दि. १० एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन खर्च करण्यात यावा. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग परीपत्रक क्रमांक दि. १ एप्रिल,२०१९ व महिला व बाल विकास विभागाच्या दि. १० एप्रिल, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून विभागास दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०५१३१६१३४१६७३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Rangrao Waghmode

Digitally signed by Shrikant Rangrao Waghmode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Woman and Child Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d6290e8e870a1c46cd16d3903f765faf7b03d0164 6947b584aa89c266409a04, cn=Shrikant Rangrao Waghmode
Date: 2019.05.13 16:17:04 +05'30'

(श्रीकांत वाघमोडे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.

२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
७. कक्ष अधिकारी (व्यय-६ / अर्थसंकल्प-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना विनंती करण्यात येते की, सदर निधी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तात्काळ वितरीत करण्यात यावा.
९. निवड नस्ती (का-९).